सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन नागरी सेवेत पुनर्नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करणे....

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

**शासन निर्णय क्रमांक. पुनिवे-२०१९/प्र.क्र.१६६/सेवा-४**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ३० ऑगस्ट २०१९

संदर्भ : १) शासन निर्णय, वित्त विभाग पुनिवे-१००९/प्र.क्र.७८/सेवा-४, दि.११ जुलै, २०१२.

२) वित्त विभाग अधिसुचना क्र. वेपुर-१०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि. ३० जानेवारी, २०१९.

३)केंद्र शासनाचे ज्ञापन क्रमांक :F.No.3/3/२०१६-Estt.(Pay-II) , दि.१८.१०.२०१७.

## शासन निर्णय

सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन नागरी सेवेत पुनर्नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करण्याबाबतचे आदेश संदर्भाधीन क्रमांक १ येथे उल्लेखिलेल्या दिनांक ११ जुलै, २०१२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती करण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन अधिसूचना वित्त विभाग दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. तथापि, सदर अधिसूचनेतील नियम ८ नुसार दिनांक १ जानेवारी, २०१६ नंतर राज्याच्या सेवेतील पुनर्नियुक्त माजी सैनिकांचे अंतिम वेतन संरक्षित होत नाही, ज्यामुळे वसुली करावी लागण्याची शक्यता अथवा वेतन कुंठीत होण्याची शक्यता आहे. सदर बाब विचारात घेऊन पुनर्नियुक्त माजी सैनिकांची सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती पुढीलप्रमाणे करण्यात यावी:-

१. दिनांक १ जानेवारी २०१६ पूर्वी सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन दिनांक १ जानेवारी २०१६ पूर्वीच राज्य सेवेत पुनर्नियुक्त माजी सैनिक व राजादिष्ट अधिकारी यांची सातव्या वेतन आयोगातील वेतननिश्चिती संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी २०१९ मधील नियम ७ मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे करावी.

२. (अ) दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वी सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर राज्याच्या नागरी सेवेत पुनर्नियुक्त झालेल्या माजी सैनिकांची वेतननिश्चिती माजी सैनिकांचे मूळ वेतन (मूळ वेतन + गुड सर्व्हिस पे + क्लास पे/क्लास अलाऊंस + एक्स ग्रुप पे + ग्रेड पे) विचारात घेऊन संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ मधील नियम ७ नुसार करण्यात यावी. २.५७ ने गुणून येणारे मूळ वेतनाची रक्कम सदर पदासाठी अनुज्ञेय किमान वेतनापेक्षा कमी येत असल्यास ज्या पदावर कर्मचाऱ्याची नियुक्ती झाली आहे त्या पदाच्या किमान वेतनावर वेतननिश्चिती करावी. तसेच सदर रक्कम कमाल वेतनापेक्षा अधिक असल्यास ती रक्कम व कमाल वेतन यामधील फरक वैयक्तिक वेतन म्हणून मंजूर करण्यात यावी.

उदा. (रक्कम रुपये)

१. सैन्य सेवेतील सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे अंतिम वेतन (मूळ वेतन+ग्रेड पे +जी.एस.पे+ क्लास पे) # : (१०६७०+२८००+१९६+३००)=१३९६६

२. पुनर्नियुक्तीच्या पदाची सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनबँड: पीबी- १-रु.५२००-२०२००, ग्रे.पे.१९००

३. २.५७ या गुणांकाने गुणून येणारे वेतन: १३९६६ x २.५७ = ३५८९२.६२ ( नजीकच्या रूपयात पूर्णांकित करून रू. ३५८९३)

४. रू. १९०० या ग्रेड वेतनाशी समकक्ष वेतन स्तर: एस-६

५. वेतन मॅट्रिक्समधील सुधारित वेतन :
(रू. ३५८९३/- वेतन मॅट्रीक्स मध्ये नसल्याने वेतन स्तर एस-६ मधील त्यापुढील रक्कम) रू. ३६१००

# एक्स ग्रुप पे मूळ वेतनामध्ये समाविष्ट असेल.

| वेतनबँड | पीबी: १- रू. ५२००-२०२०० |
|---|---|
| ग्रेड वेतन.रू : | १९०० |
| स्तर | एस-६ |
| १८. | ३३००० |
| १९. | ३४००० |
| २०. | ३५००० |
| **२१.** | **३६१००** ← |
| २२. | ३७२०० |

(ब) दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वी सैनिकी सेवेतून राजादिष्ट पदावरून सेवानिवृत्त होऊन दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर राज्याच्या नागरी सेवेत पुनर्नियुक्त झालेल्या

सैनिकी सेवेतील माजी राजादिष्ट अधिकाऱ्यांची सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती पुढीलप्रमाणे करण्यात यावी :-

संबंधित राजादिष्ट अधिकारी सैनिकी सेवेतून निवृत्त होताना घेत असलेल्या मूळ वेतनास (मूळ वेतन + ग्रेड पे + रँक पे) २.५७ ने गुणण्यात यावे (व येणारी रक्कम नजीकच्या रूपयात पूर्णांकित करावी). सदर रकमेतून सैनिकी सेवेतील सुधारित निवृत्तिवेतन (सैनिकी सेवतील सुधारित निवृत्तिवेतन वजा दुर्लक्षित निवृत्तिवेतन) वजा करण्यात यावे. अशा प्रकारे येणारी रक्कम विचारात घेऊन संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ मधील नियम ७ नुसार वेतननिश्चिती करण्यात यावी. २.५७ ने गुणून येणारे मूळ वेतनाची रक्कम सदर पदासाठी अनुज्ञेय किमान वेतनापेक्षा कमी येत असल्यास ज्या पदावर कर्मचाऱ्याची नियुक्ती झाली आहे त्या पदाच्या किमान वेतनावर वेतननिश्चिती करावी. तसेच सदर रक्कम कमाल वेतनापेक्षा अधिक असल्यास ती रक्कम व कमाल वेतन यामधील फरक वैयक्तिक वेतन म्हणून मंजूर करण्यात यावी.

(रक्कम रुपये)

१. सैन्य सेवेतील सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे अंतिम वेतन (मूळ वेतन+ग्रेड पे+ रँक पे) # : ३२०००+६६०० = ३८६००

२. पुनर्नियुक्तीच्या पदाची सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनबँड: पीबी-३-रु.१५६००-३९१००, ग्रे.पे.५४००

३. माजी राजादिष्टीत अधिकाऱ्याचे सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित निवृत्तिवेतन : ४९६०१ $ (३८६००÷२ x २.५७)

४. २.५७ या गुणांकाने गुणून येणारे वेतन:
 ३८६०० x २.५७ = ९९२०२ (रक्कम पूर्ण रुपयात नसल्यास नजीकच्या रूपयात पूर्णांकित करून घ्यावी)

५. २.५७ ने गुणून येणारी रक्कम - सैनिकी सेवेतील सुधारित निवृत्तिवेतन (सुधारित निवृत्तिवेतन - दुर्लक्षित करावयाची निवृत्तिवेतनाची रक्कम ) : ९९२०२ - (४९६०१ - १५०००) = ६४६०१

६. रू. ५४०० या ग्रेड वेतनाशी समकक्ष वेतन स्तर: एस-२०

७. वेतन मॅट्रिक्समधील सुधारित वेतन) : (६४६०१ इतकी किंवा वेतन स्तर एस- २० मधील त्यापुढील रक्कम) रू. ६५०००

#रँक पे सुध्दा असल्यास मुळ वेतनाचा भाग असेल.

$ सैन्य सेवेतील निवृत्तिवेतन हे तपासून घ्यावे, जे पी.पी.ओ. वर असेल तेच घ्यावे.

| वेतनबँड | पीबी: ३- रू. १५६००-३९१०० |
|---|---|
| ग्रेड वेतन रु. | ५४०० |
| स्तर | एस-२० |
| ५. | ६३१०० |
| ६. | ६५००० ← |
| ७. | ६७००० |
| ८. | ६९००० |
| ९. | ७११०० |

३. (अ) दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन राज्याच्या नागरी सेवेत पुनर्नियुक्त झालेल्या माजी सैनिकांची वेतननिश्चिती सैनिकी सेवेतून

सेवानिवृत्त होताना त्यांचे सातव्या वेतन आयोगानुसार निश्चित झालेल्या अंतिम वेतनावरच (मूळ वेतन + गुड सर्विस पे/जी.सी.बी पे +क्लास पे/क्लास अलाऊंस + एक्स ग्रुप पे ) करण्यात यावी.

मात्र अंतिम वेतनाइतका टप्पा वेतनस्तरामध्ये नसेल तर, अंतिम वेतनाच्या लगतच्या खालच्या वेतन टप्प्यावर वेतननिश्चिती करण्यात यावी आणि उर्वरीत वेतन वैयक्तिक वेतन म्हणून मंजूर करण्यात यावे. सदर वैयक्तिक वेतन पुढील वेतनवाढीमध्ये समायोजित करण्यात यावे. सदर वैयक्तिक वेतन सर्व प्रयोजनार्थ मूळ वेतनाचा भाग समजण्यात येईल.

माजी सैनिक नागरी सेवेत ज्या पदावर नियुक्त झाला आहे, त्या पदासाठी विहीत केलेल्या वेतन स्तरातील कमाल वेतनापेक्षा सैनिकी सेवेतील अंतिम मूळ वेतन जास्त असेल, तर त्याला या दोन्हीमधील फरक वैयक्तिक वेतन म्हणून द्यावे आणि त्या पदाच्या किमान वेतनापेक्षा सैनिकी सेवेतील अंतिम मूळ वेतन कमी असेल तर, त्या पदाच्या वेतन स्तरातील किमान वेतनावर त्याची वेतननिश्चिती करावी.

उदा. (रक्कम रुपये)

१. सैन्य सेवेतील सातव्या वेतन आयोगाप्रमाणे अंतिम वेतन (मूळ वेतन +जी.एस.पे + क्लास पे) #
५२६००+२००+६००=५३४००
२. पुनर्नियुक्तीच्या पदाचा सुधारित वेतन स्तर: एस-६
३. सातव्या वेतन आयोगानुसार पुनर्नियुक्तीनंतरचे वेतन: ५३००० + वैयक्तिक वेतन : ४००
\# एक्स ग्रुप पे (असल्यास) मूळ वेतनाचा भाग असेल

| **वेतन स्तर - एस-६** | |
|---|---|
| ३३. | ५१५०० |
| **३४.** | **५३०००**← + वैयक्तिक वेतन **४००** |
| ३५. | ५४६०० |
| ३६. | ५६२०० |
| ३७. | ५७९०० |

(ब) दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर सैनिकी सेवेतून राजादिष्ट पदावरून सेवानिवृत्त होऊन दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर राज्याच्या नागरी सेवेत पुनर्नियुक्त झालेल्या माजी सैनिकी राजादिष्ट अधिकाऱ्यांची वेतननिश्चिती पूढीलप्रमाणे करण्यात यावी :-

संबंधित राजादिष्ट अधिकाऱ्यास सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होताना त्याचे सातव्या वेतन आयोगानुसार निश्चित झालेले अंतिम मूळ वेतन (मूळ वेतन + रँक पे) वजा सैनिकी सेवतील सुधारित निवृत्तिवेतन (सैनिकी सेवेतील सुधारित निवृत्तिवेतन वजा दुर्लक्षित रक्कम) एवढे वेतन अनुज्ञेय करावे. मात्र असे वेतन अनुज्ञेय करत असताना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १६२ (ए) नुसार

पुनर्नियुक्तीचे वेतन सैनिकी सेवेतील अंतिम वेतनापेक्षा (मूळ वेतन + रँक पे) अधिक असता कामा नये.

अंतिम मूळ वेतन (मूळ वेतन + रँक पे) वजा सैनिकी सेवेतील सुधारित निवृत्तिवेतन (सैनिकी सेवेतील सुधारित निवृत्तिवेतन वजा दुर्लक्षित रक्कम यानुसार येणाऱ्या वेतनाइतका टप्पा वेतन स्तरामध्ये नसेल तर, लगतच्या खालच्या वेतन टप्प्यावर वेतननिश्चिती करण्यात यावी आणि उर्वरीत वेतन वैयक्तिक वेतन म्हणून मंजूर करण्यात यावे. सदर वैयक्तिक वेतन पुढील वेतनवाढीमध्ये समायोजित करण्यात यावे. सदर वैयक्तिक वेतन सर्व प्रयोजनार्थ मूळ वेतनाचा भाग समजण्यात येईल.

उदा.

<table>
<tr><td rowspan="4">१. सैनिकी सेवेतील सातव्या वेतन आयोगाप्रमाणे अंतिम वेतन (मूळ वेतन + रँक पे)<br>१६६३०० +६०००= १७२३००<br>२. पुनर्नियुक्तीच्या पदाचा सुधारित वेतन स्तर: एस-२०<br>३. माजी राजादिष्ठीत अधिकाऱ्याचे सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित सेवा निवृत्तिवेतन : ८६१५०/-$<br>४. [सैनिकी सेवेतील सातव्या वेतन आयोगाप्रमाणे अंतिम वेतन - (सैनिकी सेवेतील सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित सेवा निवृत्तिवेतन - दुर्लक्षित करायची रक्कम)]<br>[१७२३०० - (८६१५० - १५०००)] = १०११५० (हा वेतन टप्पा सुधारित वेतन स्तर: एस-२० मध्ये नाही. म्हणून<br>सातव्या वेतन आयोगानुसार पुनर्नियुक्तीनंतरचे वेतन: ९८४००+ वैयक्तिक वेतन : २७५०</td><td colspan="2">वेतनस्तर - एस- २०<br><br>रू. ५६१००-१७७५००</td></tr>
<tr><td>२०.</td><td>९८४००<br>+ वैयक्तिक वेतन २७५०</td></tr>
<tr><td>२१.</td><td>१०१४००</td></tr>
<tr><td>२२.</td><td>१०४४००</td></tr>
<tr><td>$ सैनिकी सेवेतील निवृत्तिवेतन तपासून पी.पी.ओ. प्रमाणे घ्यावे</td><td></td><td></td></tr>
</table>

४. दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर सैनिकी सेवेतून अथवा सैनिकी सेवेतील राजादिष्ट पदावरुन सेवानिवृत्त होऊन दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर राज्याच्या नागरी सेवेत पुनर्नियुक्त झालेल्या ज्या माजी सैनिकांची / राजादिष्ट अधिकाऱ्यांची ७ व्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चितीचे अंतिम वेतन प्रमाणपत्रे अप्राप्त आहेत त्यांचेबाबतीत दि.११ जुलै, २०१२ च्या शासन निर्णयानुसार ६ व्या वेतन आयोगातील वेतनास २.५७ ने गुणून तात्पुरती वेतननिश्चिती करावी. तद्नंतर ७ व्या वेतन आयोगानुसार सैनिकी सेवेतील अंतिम वेतन प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर यथावकाश वरील परिच्छेद ३ (अ) / (ब) नुसार अंतिमरीत्या वेतननिश्चिती करण्यात यावी.

५. सैनिकी सेवेतून निवृत्त होऊन नागरी सेवेत पुनर्नियुक्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती केल्यानंतर पुढील वेतनवाढी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील तरतूदीनुसार विनियमित होतील.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मधील नियम १६२ (ए) (दोन) (ए) अन्वये सैनिकी सेवेतून निवृत्त झालेल्या राजादिष्ट अधिकाऱ्यांच्या प्रकरणी दि.१.१.२०१६ पासून दुर्लक्षित निवृत्तिवेतन मर्यादा यापूर्वीच्या रु.४०००/- वरुन रु. १५०००/- एवढी वाढविण्यात येत आहे.

७. सैनिकी सेवेतून निवृत्त होऊन दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर नागरी सेवेत पुनर्नियुक्त होणाऱ्या ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मधील नियम १६२ (ए) व १६२ (बी) नुसार वेतननिश्चिती करावयाची नसेल, त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील नियम ८ नुसार किमान वेतनावर वेतननिश्चिती करण्याचा विकल्प देता येईल. असा विकल्प हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत देणे आवश्यक आहे. हे आदेश सर्व माजी सैनिकांमधून पुनर्नियुक्त कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी संबधित कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुखांची राहील.

८. राज्य शासनाकडून निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन घेणारे जे कर्मचारी राज्य शासनाकडून वेतन घेत आहेत, अशा कर्मचाऱ्यांच्या वेतन किंवा निवृत्तिवेतनापैकी कोणत्याही एका रकमेवर महागाई भत्ता देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. मात्र माजी सैनिकांचे निवृत्तिवेतन केंद्र शासनाकडून देण्यात येत असल्यामुळे पुनर्नियुक्त माजी सैनिकांना त्यांच्या निवृत्तिवेतनावर मिळत असलेला महागाई भत्ता दुर्लक्षित करुन नागरी सेवेतील पदाकरिता मिळणाऱ्या वेतनावर महागाई भत्ता अनुदेय राहील.

९. राज्याच्या सेवेत पुनर्नियुक्त झालेल्या माजी सैनिकांची/राजादिष्ट अधिकाऱ्यांची नागरी सेवेतील वेतननिश्चिती करताना मिलीटरी पे/मिलीटरी सर्व्हिस पे विचारात घेण्यात येऊ नयेत.

१०. सैनिकी सेवेतून राज्य सेवेत नव्याने रुजू होणाऱ्या सेवा कनिष्ठ माजी सैनिकांची/ राजादिष्ट अधिकाऱ्यांचे वेतन त्यांच्या सैनिकी सेवेतील वेतनमानामुळे राज्य सेवेत पुनर्नियुक्त वरिष्ठ कर्मचाऱ्यापेक्षा जास्त असू शकते, अशा परिस्थितीत कनिष्ठाइतके वेतन उंचावून देण्याची मागणी कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाही.

११. सदर शासन निर्णय लघुसेवा राजादिष्टीत अधिकारी संवर्गास लागू नसून, लघुसेवा राजादिष्टीत अधिकारी संवर्गांची वेतननिश्चिती ही सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. आरटीए-१०८६/३१७९/प्र क्र. २१९/९१/२८, दिनांक २ जून, १९९२ प्रमाणेच होईल.

१२. संबंधित माजी सैनिक नागरी सेवेत ज्या कार्यालयात नियुक्त झाले आहेत, त्या कार्यालय प्रमुखाने उपरोक्त कार्यपध्दतीप्रमाणे वेतननिश्चिती करावी व वेतन पडताळणी पथकाकडून वेतननिश्चितीची पडताळणी करून घेण्यात यावी.

१३. सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ लागू असलेल्या मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापिठे तसेच जिल्हा परिषदा येथे पुनर्नियुक्त होणाऱ्या माजी सैनिकांची वेतननिश्चिती प्रस्तुत सूचनांनुसार करण्यात यावी.

१४. वेतननिश्चितीसंदर्भातील महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १६२ (ए) व १६२ (बी) मधील तरतुदी या शासन निर्णयातील तरतुदींच्या मर्यादेत सुधारण्यात आल्या आहेत, असे समजण्यात यावे.

१५. ज्या प्रकरणी माजी सैनिकांना नागरी सेवेत पुनर्नियुक्तीनंतरच्या वेतननिश्चिती करताना वैयक्तिक वेतन मंजूर करण्यात आले आहे, त्याबाबतीत वैयक्तिक वेतनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम २१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

१६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८३०११२४०७०५०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34851e2984e9f793b66f7249aaa9c1a, postalCode=400032, street=Y-5/66,GOVERNMENT COLONY,MUMBAI,
serialNumber=d4994742192306fcc1dea9aadd3810639506519fa652b919767b98b04e905a18, ou=FINANCE DEPUTY SECRETARY,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2019.08.30 11:35:55 +05'30'

**( इंद्रजित गोरे )**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
७) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
८) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व विभागीय आयुक्त.

१०) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
१२) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती.
१३) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर.
१४) सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण).
१५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१७) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद.
१८) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
१९) राज्यपालांचे सचिव.
२०) मुख्यमंत्र्यांचे सचिव.
२१) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.
२२) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली.
२३) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई.
२४) *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
२५) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२६) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२७) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२८) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
२९) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
३०) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व).
३१) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
३२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३३) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
३४) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेजसमोर, पुणे ४११ ०३०.
३५) मंत्रालयातील सर्व विभाग.
३६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३७) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
३८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
३९) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४०) तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४१) महानगरपालिका प्रशासन, मुंबई.
४२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

४३) सर्व विभागीय तंत्रशिक्षण उपसंचालक.
४४) शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई, दक्षिण / उत्तर / पश्चिम.
४५) सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ.
४६) सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य.
४७) सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण).
४८) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठे, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
४९) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
५०) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
५१) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
५२) कुल सचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
५३) कुल सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेर, जिल्हा रायगड.
५४) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - ४०० ००१.
५५) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२०.
५६) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई - ४०० ००४.
५७) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई - ४०० ०१३.
५८) इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
५९) नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०००२१.
६०) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई - ४०० ०२८.
६१) वित्त विभागातील सर्व कार्यासने.
६२) निवड नस्ती.
* पत्राद्वारे.